ePaper
शिंदे आणि फडणवीस यांच्यातील युती अभेद्य! उदय सामंतांचं मोठं विधान
वर्ष - 9 । अंक -19 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- श्रेयस अय्यरची लॉटरी लागणार?
- "लॉरेन्स बिश्नोई को भेजूं क्या?"
- मुनीर जनतेवर अत्याचार करताय!
- गणेशोत्सवाच्या सोहळ्याची सांगता!


www.mahaenews.com । सोमवार, दि. 8 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## तिसऱ्या महायुद्धाची चिन्हे? ड्रोनने घडवून आणलेल्या स्फोटामुळे खळबळ

# जग हादरलं, इस्रायलचं विमानतळ उडवलं!

### युक्रेनवर हल्ला केल्याने डोनाल्ड ट्रम्प संतापले, रशियाला शिक्षा देण्याची केली घोषणा

। ८ । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**सध्या इस्रायल आणि हुथी बंडखोरांत टोकाचा संघर्ष सुरू आहे. येमेनधील हुथी बंडखोरांनी नुकतेच इस्रायलवर यशस्वी हल्ला केला आहे. या हल्ल्यात हुथी बंडखोरांनी इस्रायलच्या विमानतळालाच लक्ष्य केलंय. येमेनच्या ड्रोनच्या मदतीने हे हल्ले करण्यात आले आहेत. या हल्ल्यात इस्रायलमधील रामोन विमानतळाची मोठी नासधूस झाली आहे.**



#### ड्रोन हल्ल्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल

हुथी बंडखोरांनी केलेल्या या हल्ल्यानंतर या विमानतळाच्या कामात अडथळा निर्माण झाला. तसेच एअर ट्रॅफिकही थांबवण्यात आले. या अचानक केलेल्या हल्ल्यामुळे अनेक विमानांचे उशिरा उड्डाण झाले. विशेष म्हणजे हुथी बंडखोरांनी केलेल्या हल्ल्याचे काही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या व्हिडीओंमध्ये विमानतळाच्या परिसरात झालेला स्फोट आणि स्फोटानंतर निघालेला धूर स्पष्टपणे दिसत आहे. या हल्ल्याबाबत नंतर इस्रायल सरकारनेही माहिती दिली आहे. या माहितीनुसार येमेनकडून डागण्यात आलेल्या चौथ्या ड्रोनमुळे रामोन विमानतळाचे नुकसान झाले. या हल्ल्यात दोन नागरिक जखमी झाले आहेत, असे इस्रायलने सांगितले आहे. चार ड्रोन हल्ले, एक हल्ला विमानतळावर मिळालेल्या माहितीनुसार इस्रायलवर येमेनमधून एकूण चार ड्रोन डागण्यात आले होते. यातील तीन ड्रोन हे इस्रायली एअर डिफेन्स सिस्टिमने उद्ध्वस्त करून टाकले. मात्र चौथा ड्रोन रामोन विमानतळावर पडला आणि त्याचा स्फोट झाला. हुथी बंडखोरांनी केलेल्या या हल्ल्यांदरम्यान सायरन वाजले नाहीत. त्यामुळेच इस्रायलमधील लोक बंकरमध्ये लपू शकले नाहीत. येमेनमधून ड्रोन हल्ला होऊनही सायरन का वाजले नाही? याची आता चौकशी केली जाणार आहे.

#### आठवड्यापूर्वी इस्रायलने केला होता हल्ला

दरम्यान, याआधी इस्रायलने गेल्या आठवड्यात येमेनवर हल्ला केला होता. या हल्ल्यामुळे आम्ही आता या हल्ल्याचा सूड घेऊ असे हुथी बंडखोरांनी ठरवले होते. तेव्हापासून हुती बंडखोरांकडून इस्रायवर हल्ले करण्यात येत आहेत. हुती बंडखोर इस्रायलशी संबंधित असलेल्या लाल समुद्रातील जहाजांनाही लक्ष्य करत आहेत. आता हा संघर्ष कोणत्या टोकाला जातो? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

#### युक्रेनवर हल्ला केल्याने डोनाल्ड ट्रम्प संतापले, रशियाला शिक्षा देण्याची केली घोषणा

रशियाने युक्रेनवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला केला आहे. युक्रेनची राजधानी कीवमधील मंत्री परिषदेच्या इमारतीवर ड्रोन आणि क्षेपणास्त्राच्या मदतीने हा हल्ला केला. या हल्ल्यात मोठे नुकसान झाले आहे. हा विध्वंस पाहून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प संतापले आहेत. व्हाईट हाऊसमध्ये माध्यमांशी बोलताना ट्रम्प यांनी 'आता रशियावर अधिक कडक आर्थिक निर्बंध लादण्याची वेळ आली आहे' असं विधान करत रशियाला शिक्षा देण्याची घोषणा केली आहे.

#### डोनाल्ड ट्रम्प यांची रशियाला शिक्षा देण्याची घोषणा

डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की, हे युद्ध थांबवण्यासाठी आणि रशियाला चर्चेच्या टेबलावर आणण्यासाठी अमेरिका निर्बंध आणखी कडक करण्यात तयार आहे. आतापर्यंत लादलेले निर्बंध पुरेसे नाहीत. जर रशियाने आक्रमक हल्ले सुरू ठेवले तर आम्ही अधिक कठोर पावले उचलू. रशियाला युद्ध संपवण्यास आणि शांतता चर्चा सुरू करण्यास भाग पाडणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

#### 800 पेक्षा जास्त ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ला

रशियाची कृती जागतिक शांततेला धोक्यात आणत आहेत असं म्हणत ट्रम्प यांनी युरोपियन मित्र राष्ट्रांनाही पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. कारण आज रशियाने कीवमधील युक्रेनियन सरकारच्या मुख्य इमारतीवर हल्ला केला. यावर बोलताना युक्रेनच्या



पंतप्रधान युलिया स्विरिडेन्को म्हणाल्या की, या हल्ल्यात इमारतीच्या छताला आणि वरच्या मजल्यांना नुकसान झाले आहे. तसेच हल्ल्यानंतर आग लागली होती. समोर आलेल्या माहितीनुसार रशियन सैन्याने एकाच वेळी 800 हून अधिक ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ला केला आहे.

#### झेलेन्स्की काय म्हणाले?

देशातील 37 ठिकाणी 9 क्षेपणास्त्रे आणि 56 रशियन ड्रोन पडल्याचा दावा युक्रेनच्या हवाई दलाने केला आहे. या हल्ल्यात एका मुलासह चार जणांचा मृत्यू झाला. रशियाकडून राजधानी कीवमधील स्व्याटोशिंस्की भागात नऊ मजली इमारतीवर हल्ला करण्यात आला. युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी याबाबत बोलताना म्हटले की, 'ही सामान्यांची हत्या आहे. खरी राजनैतिक कूटनीति खूप आधीच सुरू होऊ शकली असती, मात्र जगाची राजकीय इच्छाशक्ती भंग व्हावी म्हणून रशिया जाणूनबुजून युद्ध वाढवत आहे.'

## आता तिसरे महायुद्ध अटळ? नोबेल पुरस्कार विजेत्या तज्ज्ञानेच केलं भाकित!

रशिया-युक्रेन, इस्रायल-इराण, इस्रायल हमास यांच्यातील संघर्षामुळे जगात आता तिसरे महायुद्ध चालू होते की काय? असा सवाल उपस्थित केला जातो. सध्याची जागतिक परिस्थिती पाहून या युद्धाचे ढग गडद झाल्याचेही म्हटले जाते. असे असतानाच आता श्रीलंकेतील नोबेल पुरस्कार विजेते मोहन मुनासिंघे यांनी जगापुढे असलेल्या अणुयुद्धाच्या धोक्याबद्दल सतर्क केले आहे. नुकतेच चीनमध्ये एससीओ शिखर परिषद पार पडली. या बैठकीतील चीन, रशिया आणि भारत यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधांवरही भाष्य केले आहे. चीन, रशिया आणि भारत हे आशियातील सर्वांत शक्तीशाली देश आहेत, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. नुकतेच चीनमध्ये एससीओ शिखर परिषद पार पडली. या बैठकीतील चीन, रशिया आणि भारत यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंधांवरही भाष्य केले आहे. चीन, रशिया आणि भारत हे आशियातील सर्वांत शक्तीशाली देश आहेत, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. अणुयुद्धाच्या शक्यतेवर केलेल्या एका जुन्या विधानावरही यावेळी भाष्य केले.

सोहळ्याची सांगता

## सकाळी साडेनऊ वाजण्याची सर्वांना प्रतीक्षा

# गणेशोत्सवाच्या सोहळ्याची सांगता!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**श्रद्धा आणि भक्तिभावाने भारलेल्या गणेशोत्सवाच्या आनंद सोहळ्याची शनिवारी (६ सप्टेंबर) सांगता होणार आहे. ढोल-ताशांचा निनाद, बँडपथकांनी वाजविलेल्या मधुर सुरावटी आणि 'मंगलमूर्ती मोरया'चा गजर करीत लाडक्या गणरायाला वैभवशाली विसर्जन मिरवणुकीने निरोप देण्यासाठी सारे सज्ज झाले आहेत. मानाच्या आणि प्रमुख मंडळांची विसर्जन मिरवणुकीची तयारी पूर्ण झाली असून, सर्वांनाच शनिवारी सकाळी साडेनऊ वाजण्याची प्रतीक्षा आहे. विसर्जन मिरवणुकीतील सहभागावरून मंडळांमध्ये असलेला तिढा संवादातून सुटला असून, प्रत्यक्ष मिरवणूक कशी पार पडते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

## विसर्जन मिरवणुकीची तयारी पूर्ण



गणेश चतुर्थीला सुरू झालेल्या मंगलमय उत्सवाने संपूर्ण शहर गणरंगी रंगून गेले होते. दररोजची पूजा, आरती, अथर्वशीर्षपठण अशा धार्मिक कार्यक्रमांसह सांस्कृतिक उपक्रमांनी उत्सवामध्ये रंग भरले गेले. दहा दिवसांमध्ये मानाच्या गणपती मंडळांसह प्रमुख गणेश मंडळांनी साकारलेले देखावे पाहण्याचा नागरिकांमध्ये उत्साह होता. या उत्सवाचा अनंत चतुर्दशीला निघणाऱ्या वैभवशाली विसर्जन मिरवणुकीने कळसाध्याय गाठला जाणार आहे. गणरायाला निरोप देताना डोळ्यांच्या कडा पाणावणार असल्या, तरी गणेशाच्या निरोप समारंभानिमित्त काढण्यात येणाऱ्या विसर्जन मिरवणुकीमध्ये कोणताही कसर राहू नये यासाठी कार्यकर्ते झटत आहेत.महात्मा फुले मंडई येथील लोकमान्य टिळक यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासह मानाच्या गणपतींना पुष्पहार अर्पण करून आरती झाल्यानंतर सकाळी साडेनऊ वाजता विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे. श्री कसबा गणपती, श्री तांबडी जोगेश्वरी या ग्रामदैवतांच्या नावाने असलेल्या मंडळांच्या मिरवणुकीनंतर लक्ष्मी रस्त्यावर पहिल्यांदा गुलाल उधळणारे मंडळ असा लौकिक असलेल्या श्री गुरुजी तालीम मंडळाचा गणपती मार्गस्थ होईल. शतकोत्तर रौप्यमहोत्सव साजरा करणाऱ्या श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानंतर केसरीवाडा हा मानाचा पाचवा गणपती मार्गक्रमण करेल. प्रत्येक मंडळासमोर कोणते बँडपथक असणार, कोणती ढोल-ताशा पथके असतील आणि मिरवणूक कोणत्या चौकात किती वाजता पोहोचणार याचे काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. पोलीस आणि महापालिका प्रशासन मिरवणुकीसाठी सज्ज झाले आहे. विसर्जन मिरवणुकीत कोणाला त्रास होऊ लागला, तर त्यावर उपचार करण्यासाठी आपत्कालीन वैद्यकीय मदत पथक तयार ठेवण्यात आले आहे. लक्ष्मी रस्ता, केळकर रस्ता, कुमठेकर रस्ता आणि टिळक रस्ता या मिरवणुकीच्या चारही प्रमुख मार्गांवर रुग्णवाहिका तैनात आहेत. विसर्जन मिरवणुकीसाठी आठ हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. लक्ष्मी रस्त्यावरील श्री गजानन मंडळाचे यंदा ८६ वे वर्ष असून, श्री गरुड गणपती मंडळाचे यंदा ८२ वे वर्ष आहे. विसर्जन मिरवणुकीला होणारा विलंब ध्यानात घेऊन या दोन्ही मंडळांनी संयुक्त मिरवणूक काढण्याचा निर्णय घेतला. या संयुक्त मिरवणुकीचे यंदा ११ वे वर्ष आहे. आज हलक्या सरींचा अंदाज गणपती विसर्जनासाठी शहरातील मंडळे, प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. शहरात उद्या (शनिवारी) हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. छत्तीसगडच्या परिसरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे गेले दोन दिवस राज्यभरात ठिकठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता. मात्र, या कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता कमी झाली आहे.

### देखावे पाहण्याचा उत्साह होता

हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, पावसाचे प्रमाण कमी होण्याची चिन्हे आहेत.गणेश चतुर्थीला सुरू झालेल्या मंगलमय उत्सवाने संपूर्ण शहर गणरंगी रंगून गेले होते. दररोजची पूजा, आरती, अथर्वशीर्षपठण अशा धार्मिक कार्यक्रमांसह सांस्कृतिक उपक्रमांनी उत्सवामध्ये रंग भरले गेले. दहा दिवसांमध्ये मानाच्या गणपती मंडळांसह प्रमुख गणेश मंडळांनी साकारलेले देखावे पाहण्याचा नागरिकांमध्ये उत्साह होता.

# ऐन गणेशोत्सवात पुण्यात गँगवॉर

## आंदेकर खून प्रकरणातील आरोपीच्या मुलाची गोळ्या घालून हत्या

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ऐन गणेशोत्सवात पुण्यात टोळी युद्धाचा भडका उडाला आहे. माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या खुनाचा बदला घेण्यासाठी या खून प्रकरणातील आरोपी गणेश कुमकरचा मुलगा गोविंद कोमकर याचा शुक्रवारी संध्याकाळी नाना पेठ येथे गोळ्या घालून खून करण्यात आला. नाना पेठेतील हमाल तालीमजवळ एका इमारतीच्या पार्किंगमध्ये गोविंद याच्यावर पिस्तुलातून चार गोळ्या झाडण्यात आला. त्यात तो मृत्युमुखी पडला.**



वर्चस्ववादातून गेल्यावर्षी एक सप्टेंबर रोजी माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्यावर पिस्तुलातून गोळीबार करून तसेच कोयत्याने वार करून खून करण्यात आला होता. या प्रकरणात सोमनाथ गायकवाड, अनिरुद्ध दूधभाते, वनराज आंदकर यांची बहीण संजीवनी कोमकर, जयंत कोमकर आणि गणेश कोमकर यांच्यासह १६ आरोपींना अटक करण्यात आली होती.आंदेकर टोळीने वनराज आंदेकर यांच्या खुनाचा बदला घेण्याचा कट रचल्याचे नुकत्याच उघडकीस आले. धनकवडीतील आंबेगाव पठार परिसरात सोमनाथ गायकवाड आणि अनिरुद्ध दूधभाते रहायला आहेत. आंदेकर टोळीने गायकवाड आणि दूधभाते यांच्या निकटवर्तीयांवर पाळत ठेवली होती. भारती विद्यापीठ पोलीस आणि गुन्हे शाखेने कारवाई करून एकाला अटक केली होती. याप्रकरणी कृष्णा आंदेकर यांच्यासह आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात सोमनाथ गायकवाड, अनिरुद्ध दूधभाते, वनराज आंदकर यांची बहीण संजीवनी कोमकर, जयंत कोमकर आणि गणेश कोमकर यांच्यासह १६ आरोपींना अटक करण्यात आली.

### आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल

धनकवडीतील आंबेगाव पठार परिसरात सोमनाथ गायकवाड आणि अनिरुद्ध दूधभाते रहायला आहेत. आंदेकर टोळीने गायकवाड आणि दूधभाते यांच्या निकटवर्तीयांवर पाळत ठेवली होती. भारती विद्यापीठ पोलीस आणि गुन्हे शाखेने कारवाई करून एकाला अटक केली होती. याप्रकरणी कृष्णा आंदेकर यांच्यासह आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**गुड बाय बाप्पा**

## पिंपरीतील कराची चौक येथे उभारलेल्या स्वागत कक्षात मंडळांचा सत्कार

# दहा तास चाललेल्या जल्लोषपूर्ण मिरवणुकीनंतर पिंपरीमध्ये गणरायाला भावपूर्ण निरोप!

## निर्माल्य, मूर्ती संकलन उपक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पारंपरिक वेशभुषेत कलाकारांनी सादर केलेला ढोल-ताशांचा गजर... रांगोळीच्या पायघड्या... आणि फुलांची उधळण... अशा उत्साहपूर्ण वातावरणात पिंपरी येथे गणेश विसर्जन मिरवणूक शनिवारी पार पडली. यंदा पिंपरी चिंचवड मधून मूर्ती संकलन आणि निर्माल्य दान उपक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवल्याचे दिसून आले. महापालिकेने यंदा पर्यावरण पूरक आणि पीओपी अशी मूर्तींची वर्गवारी देखील केली होती. पारंपारिक वाद्य, आकर्षक चित्ररथ आणि विद्युत रोषणाई यंदाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीची वैशिष्ट्ये ठरली.**



पिंपरी येथील शगुन चौकामध्ये पारंपारिक खेळांच्या माध्यमातून लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. यावेळी पारंपारिक खेळांचा दणदणाट अवघ्या वातावरणात दुमदुमन गेले.

या विसर्जन मिरवणुकीमध्ये सहभागी झालेल्या मंडळांचे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने स्वागत करण्यात आले. गणेशभक्तांच्या भक्तिभावाचा सन्मान करण्यासाठी तसेच मिरवणूकीचे नियोजन करण्यासाठी महापालिकेने आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनातून पिंपरीतील कराची चौक येथे स्वागत कक्ष उभारण्यात आलेले होते. येथे सत्कार स्वीकारण्यासाठी मंडळांची लगबग होती. पिंपरी मिरवणुकीतील पहिल्या मंडळाने दुपारी सव्वादोन सुमारास हजेरी लावली. अखेरचे मंडळ रात्री ११.४५ वाजता येथे दाखल झाले. या कक्षामध्ये एकूण २९ मंडळाचे स्वागत करण्यात आले.

गणेश मंडळांच्या मिरवणूक प्रमुखांचे स्वागत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उपायुक्त अण्णा बोदडे, क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड,किशोर ननावरे,मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी व मान्यवर सहभागी झाले होते. पारंपरिक रितीरिवाजांचे जतन आणि सांस्कृतिक परंपरेला दिलेल्या योगदानाचा गौरव म्हणून मंडळ प्रतिनिधींचा सत्कार यावेळी करण्यात आला. महापालिकेच्या या उपक्रमामुळे मंडळांमध्ये आणि नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

### मंडळांसोबत नागरिकांचा उत्साह

सार्वजनिक गणेश मंडळांसोबत नागरिकांचा उत्स्फूर्त उत्साह या विसर्जन मिरवणूकित पहायला मिळाला. पिंपरीत दुपारी सव्वा दोन वाजता सुरू झालेली मिरवणूकीची सांगता रात्री बारा वाजता झाली. यात सहभागी झालेल्या शिवशंकर मित्र मंडळ, फाईव्ह स्टार मित्र मंडळ, हर्षल मित्र मंडळ, श्री नवचैतन्य तरुण मंडळ, शिवशक्ती मित्र मंडळ, फुले मार्केटचा राजा, महेश मित्र मंडळ, लालबहादूर शास्त्री मित्र मंडळ, स्वराज्य मित्र मंडळ, श्री महादेव मित्र मंडळ, एस पी मित्र मंडळ, जय भारत तरुण मंडळ, साईबाबा मित्र मंडळ, रमाबाई नगर मित्र मंडळ, १६ नंबर वाई मित्र मंडळ, श्री गणेश मित्र मंडळ, मोरया मित्र मंडळ, श्री साई तरुण मित्र मंडळ, न्यू स्टार मित्र मंडळ, गजानन मित्र मंडळ, दिग्विजय मित्र मंडळ, भागवत तरुण मंडळाचे देखावे विशेष लक्षणीय होते.

### 215 टन निर्माल्य संकलन

या अकरा दिवसांच्या उत्सवा दरम्यान अ क्षेत्रीय कार्यालय – १८.८१ टन, ब क्षेत्रीय कार्यालय – ४८.७७ टन, क क्षेत्रीय कार्यालय – २६.४६ टन, ड क्षेत्रीय कार्यालय – २७.४३ टन, इ क्षेत्रीय कार्यालय ३२.१६ टन, ग क्षेत्रीय कार्यालय – १६.२३ टन, फ क्षेत्रीय कार्यालय – २५.५२ टन, ह क्षेत्रीय कार्यालय २०.३० टन असे एकूण २१५.७० टन निर्माल्य जमा झाले.

### 1 लाख 11 हजार मूर्ती संकलन

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांकडून मूर्ती संकलन उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. पर्यावरण पूरक आणि पीओपी अशी वर्गवारी करत मूर्तींची नोंद ठेवण्यात आली होती. यामध्ये पर्यावरण पूरक मूर्ती २० हजार ७२८, तर ९१ हजार पीओपी मूर्ती संकलित करण्यात आला यामध्ये सर्वाधिक व प्रभागातून 39 हजार मूर्ती संकलन झाले. एकूण एक लाख 11 हजार मूर्ती संकलन करण्यात आले.

### ऐतिहासिक देखावे ठरले आकर्षण

पिंपरी व चिंचवड शहरात निघालेल्या मुख्य विसर्जन मिरवणुकीमध्ये राजमाता जिजाऊ माँसाहेब, छत्रपती शिवाजी महाराज, वीर मुरारबाजी अशा ऐतिहासिक देखावे काही मंडळांनी सादर केले होते. या देखाव्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पिंपरी येथील गणेश विसर्जन मिरवणुकीतील भक्तीशक्तीचा संदेश देणारा विसर्जन रथ देखील गणेशभक्तांचे आकर्षण ठरले. मिरवणुकीचे सूत्रसंचालन किरण गायकवाड,प्रफुल्ल पुराणिक,किशोर केदारी यांनी केले.

# चिंचवडमध्ये भक्तीमय वातावरणात गणरायाला निरोप

## सात तास विसर्जन मिरवणूक, किरकोळ वाद वगळता शांततेत विसर्जन मिरवणुकीची सांगता

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मंगलमूर्ती मोरयाच्या जयघोषात फुलांची मनसोक्त उधळण करत उत्साह आणि भावपूर्ण वातावरणात गणरायाला चिंचवडकरांनी निरोप दिला. चिंचवड मध्ये रात्री बारा वाजेपर्यंत 30 गणेश मंडळांच्या मूर्तींचे विसर्जन झाले. सुमारे सात तास विसर्जन मिरवणूक चालली.**



किरकोळ वाद वगळता मिरवणूक शांततेत पार पडली. चिंचवड, चापेकर चौकात महापालिकेच्या वतीने स्वागत कक्ष उभारण्यात आला होता. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विजय कुमार खोराटे, यांच्या हस्ते गणेश मंडळांचे स्वागत करण्यात आले. मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्यांच्या दुतर्फा नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. सायंकाळी चार नंतर मंडळांच्या आगमनाला सुरुवात झाली. यंदा पारंपारिक वाद्यांचा दणदणाट विसर्जन मिरवणुकीच आकर्षण ठरले. सायंकाळी पाच वाजून 30 मिनिटांनी अजिंक्य मित्र मंडळ यांचे आगमन झाले महापालिकेच्या स्वागत पेक्षा मंडळाचे स्वागत करून गणरायाला निरोप देण्यात आला. दरम्यान रात्री बारा वाजता मोरया गोसावी क्रीडांगण मित्र मंडळाच्या गणपतीने सुमारे सात तासानंतर चिंचवड मधील सार्वजनिक गणेश मंडळाच्या मिरवणूकची सांगता करण्यात आली.

### काही मंडळांची हुल्लडबाजी; नागरिकांना त्रास

यंदा चापेकर चौकात अग्निशामक दलाचा बंब आणि रुग्णवाहिका नव्हती अशा तक्रारी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केल्या. मिरवणुकी दरम्यान एका मंडळाने फोडलेल्या फटाक्याच्या ठिणग्या पुढे असलेल्या गणेश मंडळाच्या रथावर पडल्याने पेट घेतला होता. मात्र कार्यकर्त्यांनी त्वरित आग विझवल्यामुळे पुढील संकट टळले. गुलाल, भंडारा, रंग आणि भस्म उधळल्याने अनेकांना खोकल्याचा त्रास झाला.

# महासत्तेचा मार्ग ज्ञानसत्तेतूनच जातो




**विद्यापीठ अनुदान आयोगाने परदेशी विद्यापीठांना भारतात येण्यास प्रवेशद्वार खुले केल्यानंतर आता उलटसुलट चर्चा आणि प्रतिक्रियांना उधाण आले आहे. वस्तुतः हे १९९१ मध्येच व्हायला हवे होते जेव्हा अर्थ, व्यापार, उद्योग क्षेत्रात उदारीकरण, खासगीकरण, जागतिकीकरणाचे नवे पर्व भारतात सुरू झाले.**

त्याचे श्रेय तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव आणि तेव्हाचे अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांना जाते. त्याच सुमारास शिक्षणक्षेत्रातील राजकीय हस्तक्षेप, परवाना राज, लालफित आणि नोकरशाही हटवून ते खुले, स्वायत्त, स्पर्धात्मक, पारदर्शक आणि प्रवाही केले असते तर आज तीन दशकानंतर चित्र नक्कीच वेगळे दिसले असते!शांघाय रँकिंग्ज' नुसार जगातील उत्कृष्ट पहिल्या पाचशे विद्यापीठांच्या क्रमवारीत अमेरिकेची १२७, चीनची ८३ तर भारताचे फक्त एकच विद्यापीठ आहे. हे कशाचे द्योतक आहे? कम्युनिस्ट चीनला जे जमले ते लोकशाही भारताला का जमू नये? चीनची उच्च शिक्षणातील ही मुसंडी गेल्या २० वर्षांतील आहे. राजकीय, सांस्कृतिक, भाषिक अडथळे पार करून अत्यंत कठीण निकष ओलांडून चीनने हे यश संपादन केले आहे. ते वाखाणण्यासारखेच आहे. प्रतिवर्षी साडेपाच लाख भारतीय विद्यार्थी चार अब्ज डॉलर्स इतके परकीय चलन खर्च करून



प्रगत देशात उच्च शिक्षणासाठी जातात आणि तिथेच स्थिरावतात. त्यामुळे 'ब्रेन ड्रेन' होतो. याचा 'रिव्हर्स फ्लो' होण्यासाठी भारतीय विद्यापीठे जागतिक दर्जाची होणे आवश्यक आहे.भारतात 'आयआयटी', 'आयआयएम', 'आयसर', 'आयआयएससी', 'एम्स' ही शैक्षणिक गुणवत्तेची बेटे आपण तयार केली आहेत. केंद्रीय विद्यापीठेही गुणवत्तापूर्ण शिक्षण देतात. मात्र संशोधनासाठी लागणार ९५ टक्के निधी या केंद्रीय शिक्षणसंस्थांना आणि विद्यापीठांना मिळतो. राज्यशासित विद्यापीठे ही राजकीय हस्तक्षेप, परवाना राज, नोकरशाही, लालफित यांनी ग्रासली आहेत. तसेच ती हजारांच्या घरातील संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था आणि लाखांच्या घरातील विद्यार्थी संख्या यांच्या भारामुळे वाकली आहेत. संख्या प्रमाणाबाहेर वाढली की गुणवत्ता खालावते तसेच ४० टक्के प्राध्यापकपदे रिक्त आहेत.

तोटका संशोधन निधी आणि संसाधने असताना संशोधनाबद्दल ओरड करून काहीही उपयोग नाही. राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या शिफारसीनुसार जिल्हानिहाय एक विद्यापीठ आणि एका विद्यापीठाला १०० संलग्न महाविद्यालये असे आटोपशीर प्रमाण हवे! दरवर्षी राज्यस्तरीय 'सामायिक प्रवेश परीक्षा' रखडते आणि उशिरा प्रवेश प्रक्रिया होऊन विद्यार्थ्यांचे एक शैक्षणिक सत्र वाया जाते. याची राज्य शासनाला जाण आहे पण चाड नाही. विद्यार्थ्यांचे हे शैक्षणिक नुकसान कोण भरून देणार?व्यावसायिक महाविद्यालये राज्य शासनाच्या आदेशानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्कमाफी देतात. ही रक्कम राज्य स्तरावर हजारो कोटी रुपयांच्या घरात जाते. परंतु प्रतिवर्षी राज्य शासनाच्याच समाजकल्याणखात्यातर्फे त्याची प्रतिपूर्ती संबंधित महाविद्यालयांना वेळेवर होत नसल्यामुळे त्यांची प्रचंड आर्थिक कोंडी होते. शासनाला ही विनाअनुदानित अभियांत्रिकी, व्यवस्थापन, संगणक उपयोजन, वास्तुकला, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेलव्यवस्थापन महाविद्यालये बंद करायची आहेत काय? अशा विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालयांना किमान अर्धा डझन नियामकांचा सामना करावा लागतो. ही एक अडथळ्यांची शर्यतच असते. प्राचार्यांचा ७५ टक्के वेळ प्रशासनात जातो अध्यापन, संशोधन त्यामुळे दुय्यम बाब ठरते हे चित्र कधी बदलणार ?उच्च शिक्षणातील आरक्षण हा कळीचा मुद्दा आहे. त्याचा फेरविचार करण्याची वेळ अली आहे. गरीब आणि हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती जरूर द्यावी आर्थिक साहाय्य करावे. मात्र गुणवत्तेला तिलांजली देऊ नये. भारतीय सैन्यदल, वायुदल, नौदल ही तीनही दले आरक्षणविरहित आहेत. त्यांची कामगिरी सर्वोच्च दर्जाची आहे. माहिती तंत्रज्ञान, बॉलिवूड, क्रिकेटमध्येही आरक्षण नाही. पात्रता, गुणवत्ता, स्पर्धा यावर निवड ठरते. त्यामुळे भारताची जगात ओळख तयार झाली आहे. तेव्हा उच्च शिक्षण क्षेत्रही जागतिक दर्जाचे करावयाचे असल्यास आरक्षण हटवावे.

## संपादकीय »

### ऊर्मी तर उरणारच...

***मराठा आरक्षण आंदोलक मुंबईच्या रस्त्यांवर दिसले, यावर अनेकांनी लावलेल्या तक्रारीच्या सुराचे राजकीय आणि सामाजिक अर्थ पाहायलाच हवेत...***

मराठा आंदोलकांनी उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मुंबई रिकामी केलेली आहे. मराठा आंदोलकांमुळे मुंबई अडली, मराठा आंदोलकांमुळे देशाच्या आर्थिक राजधानीचे नुकसान किंवा 'आंदोलकांनी ताळतंत्र सोडले' या प्रकारच्या बातम्यांची चर्चाही आता थांबली आहे. नेमके किती नुकसान झाले आणि कसे, याची विश्वासार्ह आकडेवारी येईल तेव्हा येईल. गणेशोत्सवात मंडपांसाठी मुंबईभर खोदलेल्या खड्डयांची नुकसानभरपाई वसूल करा, असा न्यायालयाचा आदेश असूनही तशी काही वसुली होत नसते हा मुंबईचा इतिहास. त्यामुळे मराठा आंदोलकांपायी जे काही नुकसान झाल्याची चर्चा होती त्याची भरपाई आम्हाला द्या, अशी मागणीही दक्षिण मुंबईतल्या अमराठी भाषक रहिवासी वा दुकानदारांकडून किंवा कॉर्पोरेट मंडळींकडून होण्याची शक्यता नाही.

फौजदारी कायद्याचा मूलभूत सिद्धांत म्हणजे 'आरोपी जोपर्यंत दोषी सिद्ध होत नाही तोपर्यंत त्याला निर्दोष मानावे'. पण अपराध निश्चितीसाठीची प्रक्रियाच शिक्षा बनली तर? आरोपींबाबत अलीकडे दिलेल्या निकालात हा विरोधाभास स्पष्टपणे दिसून येतो.

## सर्वोच्च न्यायालयाच्या दंडकांचा अवमान

दिल्ली उच्च न्यायालयाने उमर खालित आणि इतरांचा अर्ज फेटाळून लावले आणि १३३ पानांचे निकालपत्र देऊन त्यांना जामीन नाकारला. निषेध करण्याचा अधिकार 'पूर्ण' नाही आणि निषेध हा वाजवी चौकटीतच व्हायला हवा अशी भूमिका न्यायालयाने या निकालपत्रात ठामपणे मांडली. हे विधान कायदेशीर तत्त्व म्हणून वादग्रस्त आहे, पण तो मुद्दा जरा बाजूला ठेवू. उमर खालिद व इतरांना जामीन नाकारणाऱ्या निकालावर खरा आक्षेपाचा मुद्दा हा की, या साऱ्या 'आरोपीं'नी त्यांच्यावरचा खटला सुरू होताच एव्हाना जवळपास पाच वर्षे कोठडीत- कच्च्या कैदेत- घालवली आहेत. प्रक्रियात्मक दृष्टीने हा अन्याय आहे.या अन्यायाच्या जखमेवर मीठ चोळणारा प्रकार म्हणजे उच्च न्यायालयाने याच निकालपत्रात न्यायालयीन प्रक्रियेच्या संथगतीचे केलेले 'तर्कसंगत वर्णन'. 'खटल्याची गती नैसर्गिकरित्या पुढे जाईल आणि घाईघाईने चालवलेला खटला दोन्ही पक्षांच्या हक्कांसाठी हानिकारक असू



शकतो' असे विधान या निकालपत्रात आहे. खटला उभाच न राहाता, आरोपांची सुनावणी सुरूच न होता पाच वर्षे तुरुंगात डांबण्याची सोय करणारी ही 'नैसर्गिक गती' कोणती आहे? हे इतर प्रकरणांपेक्षा वेगळे आहे म्हणावे तर, बलात्कारासारख्या नृशंस गुन्ह्यांमध्ये दोषी आढळलेल्या गुन्हेगारांसह दोषी आढळलेल्यांनाही नियमितपणे पॅरोल दिला जातो, अशीही उदाहरणे आहेत. शिक्षा सुनावली जाऊन तुरुंगवास झालेल्यांना कच्च्या कैद्यांपेक्षाही जास्त स्वातंत्र्य मिळते, असा याचा अर्थ काढायचा का?या निकालपत्रावर आक्षेपाचे कारण हेही आहे की, दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शैलेंदर कौर आणि न्यायमूर्ती नवीन चावला यांनी या निकालात, 'खटल्याशिवाय दीर्घकाळ तुरुंगवास जामिनाचा आधार आहे' हे न्यायतत्त्व नाकारले. सुनावणी होती जामिनासाठी, पण न्यायालयाने संबंधित आरोपींची 'कटामध्ये' कोणकोणती विशिष्ट, सक्रिय भूमिका होती, याचे तपशीलवार वर्णन केले. "या प्रथमदर्शनी पुराव्यावरून, राष्ट्राच्या अखंडतेचे रक्षण करण्याच्या राज्याच्या कर्तव्याविरुद्ध वैयक्तिक स्वातंत्र्याचे संतुलन साधण्याचे कठीण काम आमच्यापुढे आले आहे" अशा अर्थाची टिप्पणीही न्यायालयाने केली आहे.या निकालपत्राच्या परिच्छेद १३३ मध्ये उच्च न्यायालयाने उमर खालिदने अमरावतीमध्ये दिलेल्या भाषणांचा उल्लेख केला आहे. या भाषणात त्याने नागरिकत्व सुधारणा विधेयकाविरुद्ध निदर्शने करण्याचे आवाहन केले होते. याआधारे सरकारी वकिलांनी केलेल्या युक्तिवादांमुळे उच्च न्यायालयाला खात्री पटली की, अशी भाषणे दिली गेल्यानेच हिंसक दंगली उसळल्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर लक्ष वेधले गेले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

शेतकरी संघटनेचे आंदोलन

## पवारांच्या विरोधात घोषणाबाजी; शेतकरी संघटनेचे आंदोलन

# अंजना कृष्णा यांच्या फोटोला दुग्धाभिषेक!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राजकीय नेत्यांसाठी आंदोलन झाल्याचे आपण अनेकदा पाहिले आहे. पण एखाद्या नवख्या अधिकाऱ्यासाठी काही लोक रस्त्यावर उतरून घोषणाबाजी करण्याची घटना करमाळ्यात घडली आहे. यापूर्वी बीडचे जिल्हाधिकारी सुनील केंद्रेकर यांच्यासाठी लोक रस्त्यावर उतरले होते. त्याच प्रकारची प्रसिद्धी आता अंजना कृष्णा यांना मिळताना दिसत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अंजना कृष्णा यांना खडसावल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर आता त्यांच्या समर्थनार्थ करमाळ्यातील जनशक्ती शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते उतरले आहेत.**

### मी तुम्हाला आदेश देतो कारवाई रोखा




अजित पवार यांच्याबरोबर झालेल्या वादानंतर प्रसिद्धीझोतात आलेल्या अंजना कृष्णा यांच्यासाठी जनशक्ती शेतकरी संघटनेने आंदोलन केले. तसेच त्यांच्या फोटोला दुग्धाभिषेक केला. अंजना कृष्णा यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी हे निदर्शन करण्यात आल्याचे जनशक्ती शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अतुल खूपसे पाटील यांनी सांगितले.अंजना कृष्णा यांच्या समर्थनार्थ करमाळ्याचे आराध्य दैवत आई कमलाभवानीलाही यावेळी प्रार्थना करण्यात आली. लाडक्या बहिणीचा अपमान महाराष्ट्र कधीच सहन करणार नाही, असा इशारा देत शेतकऱ्यांनी अजित पवारांविरोधात घोषणाबाजी केली.अजित पवार माफी मागा, अशा घोषणाबाजी देत शेतकऱ्यांनी अंजना कृष्णा यांच्या फोटोला दुग्धाभिषेक घातला. हा शिवरायांचा महाराष्ट्र असून येथे महिलांचा सन्मान केला जातो, अशा आशयाचे बॅनरही झळकविण्यात आले. सोलापूरमधील मुरूमाच्या उत्खननाविरुद्ध कारवाई करण्यासाठी गेलेल्या अंजना कृष्णा यांच्याशी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी फोनवरून संवाद साधला होता. यावेळी अजित पवार म्हणाले होते, "ऐका, मी उपमुख्यमंत्री बोलत आहे. मी तुम्हाला आदेश देतो की, कारवाई रोखा."मात्र कार्यकर्त्यांच्या मोबाइलवर फोन आल्यामुळे पोलीस उपअधीक्षक अंजना कृष्णा यांनी अजित पवारांना ओळखले नाही आणि त्यांनी आपल्या फोनवर फोन का नाही केला? असा प्रश्न विचारला. यावर अजित पवार संतापले आणि त्यांनी तुमच्यावर कारवाई करू, तुमची एवढी डेअरिंग वाढली का?, असे संतापून म्हटले.

"तुम्हाला मला पाहायचे आहे का? तुमचा मोबाइल नंबर द्या, तुम्हाला व्हॉट्सअप कॉल करतो आणि माझा चेहरा दाखवतो. तुमची एवढी हिंमत झाली का?", असेही अजित पवार यावेळी म्हणाले. त्यानंतर अंजना कृष्णा यांना व्हिडीओ कॉल करून अजित पवार यांनी त्यांना कारवाई रोखण्याचे थेट आदेश दिले.अजित पवार यांच्याबरोबर झालेल्या वादानंतर प्रसिद्धीझोतात आलेल्या अंजना कृष्णा यांच्यासाठी जनशक्ती शेतकरी संघटनेने आंदोलन केले. तसेच त्यांच्या फोटोला दुग्धाभिषेक केला. अंजना कृष्णा यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी हे निदर्शन करण्यात आल्याचे जनशक्ती शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अतुल खूपसे पाटील यांनी सांगितले.अंजना कृष्णा यांच्या समर्थनार्थ करमाळ्याचे आराध्य दैवत आई कमलाभवानीलाही यावेळी प्रार्थना करण्यात आली. लाडक्या बहिणीचा अपमान महाराष्ट्र कधीच सहन करणार नाही, असा इशारा देत शेतकऱ्यांनी अजित पवारांविरोधात घोषणाबाजी केली.अजित पवार माफी मागा, अशा घोषणाबाजी देत शेतकऱ्यांनी अंजना कृष्णा यांच्या फोटोला दुग्धाभिषेक घातला. हा शिवरायांचा महाराष्ट्र असून येथे महिलांचा सन्मान केला जातो, अशा आशयाचे बॅनरही झळकविण्यात आले. सोलापूरमधील मुरूमाच्या उत्खननाविरुद्ध कारवाई करण्यासाठी गेलेल्या अंजना कृष्णा यांच्याशी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी फोनवरून संवाद साधला होता.

### तुमची एवढी डेअरिंग वाढली का?

यावेळी अजित पवार म्हणाले होते, "ऐका, मी उपमुख्यमंत्री बोलत आहे. मी तुम्हाला आदेश देतो की, कारवाई रोखा."मात्र कार्यकर्त्यांच्या मोबाइलवर फोन आल्यामुळे पोलीस उपअधीक्षक अंजना कृष्णा यांनी अजित पवारांना ओळखले नाही आणि त्यांनी आपल्या फोनवर फोन का नाही केला? असा प्रश्न विचारला. यावर अजित पवार संतापले आणि त्यांनी तुमच्यावर कारवाई करू, तुमची एवढी डेअरिंग वाढली का?, असे संतापून म्हटले.

# खून, अपहरण, महिलांवर अत्याचार

## देशातील 47 टक्के मंत्र्यांवर गुन्हे दाखल

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**एडीआर अर्थात असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स या संस्थेने केंद्र आणि राज्य सरकारमधील मंत्र्यांवर दाखल असलेल्या गुन्ह्यांची माहिती अहवालाद्वारे जाहीर केली आहे. या माहितीनुसार केंद्र आणि विविध राज्य सरकारांमध्ये असलेल्या मंत्र्यांपैकी जवळपास अर्ध्या मंत्र्यांवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.**




खून, अपहरण आणि महिलांवरील अत्याचार असे गंभीर स्वरुपाचेही गुन्हे काही मंत्र्यांवर दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. एडीआरच्या अहवालानुसार, केंद्र आणि राज्यातील एकूण ६४३ मंत्र्यांपैकी ३०२ मंत्र्यांवर म्हणजेच ४७ टक्के जणांवर विविध गुन्हे दाखल आहेत. ही माहिती संबंधित मंत्र्यांनीच त्यांच्या निवडणुकीच्या शपथपत्रात उघड केलेली आहे. ३०२ पैकी १७४ मंत्र्यांवर खून, अपहरण आणि महिलांवरील अत्याचारासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.गंभीर गुन्ह्याच्या आरोपाखाली ३० दिवस कारावास भोगणाऱ्या विद्यमान मंत्री, मुख्यमंत्री किंवा पंतप्रधानांना पदावरून हटवण्याची मागणी करणारे विधेयक केंद्र सरकारने नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात सादर केले. त्यानंतर काही दिवसांनी एडीआरचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. २० ऑगस्ट रोजी लोकसभेत मांडण्यात आलेले हे विधेयके संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठविण्यात आले आहे. एडीआरच्या अहवालात पक्षनिहाय आकडेवारी सादर करण्यात आली आहे. भाजपाचे केंद्र आणि विविध राज्यात मिळून ३३६ मंत्री आहेत. त्यापैकी १३६ मंत्र्यावर (४० टक्के) गुन्हे दाखल आहेत.

### किती मंत्र्यांवर गुन्हे दाखल?

यापैकी ८८ जणांवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. सत्ताधारी एनडीएतील तेलगू देसम पक्षाच्या २३ मंत्र्यांपैकी २२ जणांवर गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी १२ जणांवर गंभीर स्वरुपाचे खटले दाखल आहेत.शिवसेनेच्या (शिंदे) १३ मंत्र्यांपैकी ७ मंत्र्यांवर विविध गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी तीन जणांवर गंभीर गुन्हे दाखल असल्याचे एडीआरच्या अहवालातून समोर आले आहे.

उद्विग्न प्रतिक्रिया

## पाकिस्तानात मार्शल लॉ”; इम्रान खान यांची उद्विग्न प्रतिक्रिया

# मुनीर जनतेवर अत्याचार करताय!

## पाकिस्तानच्या जनतेवर अन्याय



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांनी पाकिस्तनाचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. इम्रान खान म्हणाले की “मुनीर हे पाकिस्तानी जनतेवर अत्याचार करत आहेत. अत्याचार करून ते सगळं काही नियंत्रणात ठेवू पाहत आहेत जेणेकरून ते दीर्घकाळ त्यांची सत्ता टिकवू शकतील आणि त्यांची राजवट चालवू शकतील. यावेळी पाकिस्तानात अघोषित मार्शल लॉ लागू करण्यात आला आहे.”**

पाकिस्तानचे माजी क्रिकेटपटू आणि माजी पंतप्रधान इम्रान खान हे सध्या तुरुंगात आहेत. जेलमधूनच त्यांनी एक निवेदन प्रसिद्ध केलं आहे ज्यात त्यांनी असीम मुनीर यांच्यावर टीका केली आहे. ते म्हणाले, “२०२४ च्या निवडणुकीत हेराफेरी करून शाहबाज शरीफ यांचं सरकार स्थापन करण्यात आलं. आता असीम मुनीर यांच्या इशाऱ्यांवर सरकार शरीफ यांच्याच कार्यकर्त्यांवर अत्याचार करत आहे.”इम्रान खान यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की “असीम मुनीर हे त्यांची त्यांची राजवट टिकवून ठेण्यासाठी पाकिस्तानच्या जनतेवर अन्याय करत आहेत, त्यामुळे देश कमकुवत होत आहे.

ज्यांनी (मुनीर अँड कंपनीने) जनादेश चोरला आहे ते आता काहीसे घाबरले आहेत. याच भीतीमुळे आमच्यावरील अत्याचार वाढत आहेत.”मला आणि माझी पत्नी बुशरा बीबी यांना ‘एकांत कारावासात’ ठेवून हे लोक माझं मानसिक खच्चीकरण करू पाहत आहेत. मी कोलमडून पडावं असं त्यांना वाटतं. मी माझे विचार सोडावे आणि जनतेचा आवाज दबला जावा असं त्यांना वाटतं.”इम्रान खान यांनी आपल्या पोस्टमध्ये पाकिस्तानमधील सध्याच्या स्थितीची १९७१ मधील याह्या खान यांच्या काळातील स्थितीशी तुलना केली आहे. तेव्हा गृहयुद्धानंतर पूर्व पाकिस्तान वेगळा होऊन नव्या बांगलादेशचा जन्म झाला होता. इम्रान खान म्हणाले, “१९७१ आणि आजच्या काळात एकच फरक आहे

की आता लोक अधिक जागरुक झाले आहेत. समाजमाध्यमांमुळे लोकांपर्यंत थोडंफार सत्य पोहोचत आहेत. समाजमाध्यमांमुळे तथ्ये लोकांपर्यंत पोहोचत आहेत. तसेच लोक अन्यायाविरोधात कसं लढायचं ते शिकले आहेत. त्यामुळे मला आशा आहे

की पाकिस्तानची जनता दडपशाही करणारी व्यवस्था संपुष्टात आणेल.”पाकिस्तानचे माजी क्रिकेटपटू आणि माजी पंतप्रधान इम्रान खान हे सध्या तुरुंगात आहेत. जेलमधूनच त्यांनी एक निवेदन प्रसिद्ध केलं आहे ज्यात त्यांनी असीम मुनीर यांच्यावर टीका केली आहे. ते म्हणाले,“२०२४ च्या निवडणुकीत हेराफेरी करून शाहबाज शरीफ यांचं सरकार स्थापन करण्यात आलं.

आता असीम मुनीर यांच्या इशाऱ्यांवर सरकार शरीफ यांच्याच कार्यकर्त्यांवर अत्याचार करत आहे.”

इम्रान खान यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की “असीम मुनीर हे त्यांची त्यांची राजवट टिकवून ठेण्यासाठी पाकिस्तानच्या जनतेवर अन्याय करत आहेत, त्यामुळे देश कमकुवत होत आहे. ज्यांनी (मुनीर अँड कंपनीने) जनादेश चोरला आहे ते आता काहीसे घाबरले आहेत.

याच भीतीमुळे आमच्यावरील अत्याचार वाढत आहेत.”मला आणि माझी पत्नी बुशरा बीबी यांना ‘एकांत कारावासात’ ठेवून हे लोक माझं मानसिक खच्चीकरण करू पाहत आहेत. मी कोलमडून पडावं असं त्यांना वाटतं. मी माझे विचार सोडावे आणि जनतेचा आवाज दबला जावा असं त्यांना वाटतं.”इम्रान खान यांनी आपल्या पोस्टमध्ये पाकिस्तानमधील सध्याच्या स्थितीची १९७१ मधील याह्या खान यांच्या काळातील स्थितीशी तुलना केली आहे.

### देश कमकुवत होत आहे

तेव्हा गृहयुद्धानंतर पूर्व पाकिस्तान वेगळा होऊन नव्या बांगलादेशचा जन्म झाला होता. इम्रान खान म्हणाले, “१९७१ आणि आजच्या काळात एकच फरक आहे की आता लोक अधिक जागरुक झाले आहेत. समाजमाध्यमांमुळे लोकांपर्यंत थोडंफार सत्य पोहोचत आहेत. समाजमाध्यमांमुळे तथ्ये लोकांपर्यंत पोहोचत आहेत. तसेच लोक अन्यायाविरोधात कसं लढायचं ते शिकले आहेत.

## पंतप्रधान मोदींचे आधी डोनाल्ड ट्रम्प यांना उत्तर

# आता फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांशी फोनवरून केली चर्चा



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने भारतीय मालावर लादलेल्या ५० टक्के टॅरिफच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि भारत यांच्यात तणाव निर्माण झाला आहे. यादरम्यान ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींशी माझी मैत्री कायम राहिल, ते एक महान पंतप्रधान आहेत, अशी प्रतिक्रिया शुक्रवारी दिली होती. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील ट्रम्प यांना उत्तर दिले आहे.**

मोदी आणि ट्रम्प यांच्यातील संवादानंतर काही तासांतच आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याशी फोनवरून दीर्घ चर्चा केल्याची बाब समोर आली आहे.

यावेळी या नेत्यांमध्ये दोन्ही देशांमधील संबंध मजबूत करण्यासाठी काम करण्याबद्दल विचारांची देवाणघेवाण झाली. पंतप्रधान मोदींनी सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याशी झालेल्या फोन संभाषणाबद्दल माहिती दिली आहे.तर दुसरीकडे भारत आणि अमेरिकेत टॅरिफ आणि ट्रेडच्या मुद्द्यावर तणावाची परिस्थिती आहे, या पार्श्वभूमीवर दोन देशांच्या नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेला विशेष महत्त्व आहे.

पंतप्रधान मोदींनी त्यांच्या एक्स हँडलवर केलेल्या पोस्टमध्ये माहिती दिली की, “राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्याबरोबर खूप चांगली चर्चा झाली.

आम्ही विविध क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्याच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि त्याचे सकारात्मक मूल्यांकन केले. युक्रेनमधील संघर्ष लवकर संपवण्याच्या प्रयत्नांसह आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण केली.

### या चर्चेला इतके महत्त्व का?

जागतिक शांतता आणि स्थिरता वाढवण्यात भारत-फ्रान्स यांच्यातील धोरणात्मक भागीदारी महत्त्वाची भूमिका बजावत राहील.”पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्यातील चर्चा ग्रासाठी महत्त्वाची आहे कारण गेल्या एका महिन्याच्या कालावधित ही या दोन नेत्यांमध्ये झालेली दुसरी चर्चा आहे आणि त्यांच्यामध्ये पुन्हा एकदा युक्रेनच्या मुद्द्यावर चर्चा झाली आहे.

# अर्चना पूरन सिंहचे आमिर खानबद्दल मोठे वक्तव्य

मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणून ओळखला जाणारा अभिनेता म्हणजे आमिर खान. अनेकदा तो चर्चेत असतो. आता अर्चना पूरन सिंह यांनी त्याच्याविषयी केलेल्या वक्तव्यामुळे अभिनेत्याची चर्चा होताना दिसत आहे.अर्चना पूरन सिंहने नुकतीच 'बॉलीवूड बबल'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत 'राजा हिंदूस्तानी' या चित्रपटातील 'तेरे इश्क में नाचेंगे' या गाण्याच्या शूटिंगवेळी आमिर खानने खरंच मद्यप्राशन केले होते का, असा प्रश्न विचारला होता. यावर उत्तर देताना अर्चना पूरन सिंहने म्हटले, "मी याबद्दल ऐकले आहे. आमचे जिथे शूटिंग सुरू होते, तिथे त्याची रूम माझ्या रूमच्या बाजूलाच होती. त्याने माझ्यासमोर कधीही मद्यप्राशन केले नाही, पण मला वाटते की त्याने त्या गाण्यासाठी मद्यप्राशनाचा प्रयोग केला असावा. पण, तो त्याच्या या प्रयोगाबद्दल खूश नव्हता."'राजा हिंदूस्तानी' चित्रपटाबद्दल अर्चना पूरन सिंहने म्हटले, "हा चित्रपट माझ्यासाठी खास होता. कारण या चित्रपटातील माझ्या





भूमिकेसाठी मला फिल्मफेअर अवॉर्डमध्ये नॉमिनेशन मिळाले होते. या एकाच भूमिकेसाठी मला नॉमिनेशन मिळाले होते. नाहीतर मी कोणतेही पुरस्कार जिंकले नाहीत. जेव्हा परमित माझ्याजवळ आला आणि मला म्हणाला की, नॉमिनेशन हे देखील पुरस्कार जिंकल्यासारखे असते. त्यावेळी मला जाणीव झाली की मला पुरस्कार मिळणार नाही, पण तरीही पुरस्कार मिळाल्यासारखे वाटत होते."अर्चना पूरन सिंह 'द ग्रेट इंडियन कपिल शो'मध्ये दिसणार आहे. हा विनोदी कार्यक्रम १३ भागांचा असणार आहे. 'द ग्रेट इंडियन कपिल शो'चा दुसरा सीझन २१ सप्टेंबरपासून प्रदर्शित होणार आहे. नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवर हा शो पाहायला मिळणार आहे. दरम्यान, १९९६ साली प्रदर्शित झालेल्या 'राजा हिंदूस्तानी' या चित्रपटाने धुमाकूळ घातला होता. आजही या चित्रपटाचा मोठा चाहतावर्ग असल्याचे पाहायला मिळते. एका लहानशा खेड्यातील टॅक्सी ड्रायव्हर एका श्रीमंत मुलीच्या प्रेमात पडतो. त्यांच्यात असलेला फरक विसरून हे जोडपे कसे एकत्र येते, अशा आशयाची ही कथा आहे. या चित्रपटात आमिर खान, करिश्मा कपूर, अर्चना पूरन सिंह, जॉनी लिवर, मोहनीश बहल हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसले होते. अर्चना या चित्रपटात नकारात्मक भूमिकेत दिसली होती.

## "लॉरेन्स बिश्नोई को भेजूं क्या?"

बॉलिवूडमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या कुटुंबाला बिश्नोई टोळीने पुन्हा एकदा धमकावण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळी सलमानचे वडील, ज्येष्ठ पटकथा लेखक व अभिनेते सलीम खान यांना धमकी मिळाली आहे. सलीम खान घराजवळच्या उद्यानात बसलेले एक इसम व बुरखा परिधान केलेली महिला स्कूटरवरून त्यांच्या जवळ गेले. यावेळी महिलेने सलीम खान यांना लॉरेन्श बिश्नोई टोळीच्या नावाने धमकी दिली.सलीम खान हे नेहमीप्रमाणे बुधवारी (१८ सप्टेंबर) सकाळी देखील मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडले होते. या स्कूटरवर एक इसम व त्याच्या मागे एक बुरखा परिधान केलेली महिला बसली होती. या स्कूटरने यू टर्न घेतला आणि चालक ती स्टूकर घेऊन सलीम खान यांच्याजवळ गेला.

## जनाईच्या लूकनं वेधलं लक्ष

प्रसिद्ध गायिका आशा भोसले (ASHA BHOSLE) यांनी अनेक हिट चित्रपटांमधील गाणी गायली आहेत. अशा भोसले यांना 'मेलोडी क्वीन' असंही म्हटलं जातं. आशा भोसले या त्यांच्या गाण्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकतात. त्या अनेक कार्यक्रमांना देखील हजेरी लावतात. नुकत्याच आशा भोसले या त्यांच्या नातीसोबत एका कार्यक्रमामध्ये स्पॉट झाल्या. यावेळी अनेक पापाराझींनी त्यांचे फोटो काढले. आशा भोसले यांच्यासोबत त्यांची नात जनाई भोसले (ZANAI BHOSLE) हिचे देखील फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. जनाईच्या सौंदर्यानं अनेकांचे लक्ष वेधले आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओमध्ये जनाई ही मोकळे केस, साडी आणि मोत्यांचे गळ्यातले अशा लूकमध्ये दिसत आहे. तर आशा भोसले या ऑफ व्हाइट कलरची साडी आणि मोत्यांची ज्वेलरी अशा लूकमध्ये दिसत आहेत. जनाई आणि आशा भोसले यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. अनेक नेटकऱ्यांनी कमेंट करुन जनाईच्या सौंदर्याचं कौतुक केलं आहे. जनाई ही आशा भोसले यांचा मुलगा आनंद भोसले यांची मुलगी आहे. जनाई ही तिच्या



## अरिजितने मन जिंकली

गायक अरिजित सिंह आपल्या आवाजाने चाहत्यांना मंत्रमुग्ध करतो. एखादा नवा सिनेमा यावा आणि त्यात अरिजितचे गाणे असावे, याची चाहते वाट बघतात. अनेक श्रोते अरिजितची जुनी हिट गाणी वेगवेगळ्या शैलीत ऐकण्यासाठी त्याच्या कॉन्सर्टला हजेरी लावतात. या कॉन्सर्टमध्ये अरिजित कधी जोडप्यांनी सांगितलेली गाणी गातो, तर आपल्या साध्या वागण्यातून, कृतीतून गातानाच चाहत्यांची मने जिंकतो. नुकत्याच एका कॉन्सर्टमध्ये अरिजितने एका चाहत्याने व्यासपीठावर ठेवलेले जेवण उचलून त्याच्या टीममधील व्यक्तीच्या हाती देत माफी मागितली. हा व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, चाहते अरिजितचे कौतुक करत आहेत. अरिजित सिंह कॉन्सर्टच्या निमित्ताने वर्ल्ड टूर करत आहे. यात नुकताच त्याचा एक कॉन्सर्ट झाला. या कॉन्सर्टमध्ये अरिजित सिंहने 'ऐ दिल है मुश्किल' सिनेमाचे टायटल ट्रॅक गाताना त्याने केलेल्या कृतीने चाहत्यांची मने जिंकली.'ऐ दिल है मुश्किल' या गाण्यातील "मुझे आजमाती है तेरी जमीं" ही ओळ गात असताना, एक व्यक्ती त्याच्या जेवणाचा बॉक्स व्यासपीठावर अरिजितच्या पायाजवळ ठेवतो. ते पाहिल्यावर अरिजित ते जेवण उचलतो आणि तिथे असणाऱ्या त्याच्या टीममधील व्यक्तीकडे सुपूर्द करतो. यानंतर गाणं गातानाच अरिजित त्या चाहत्याची माफी मागतो. असा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर फिरतोय.



## 'सर्व लोक आपला पाठलाग का करत आहेत?

अभिनेत्री करीना कपूर खानने तिच्या विविध भूमिकांमुळे चाहत्यांच्या मनावर छाप सोडली आहे. करीनाच्या उत्तम अभिनयामुळे 'जब वी मेट'मधील 'गीत', 'चमेली', 'कभी खुशी कभी गम'मधील 'पू'(पूजा) या भूमिका चाहत्यांच्या नेहमी लक्षात राहिल्या आहेत. करीनाला बॉलीवूडमध्ये ट्रेंडसेटर म्हणूनसुद्धा ओळखले जाते. झिरो फिगर ते फॅशनमधील अनेक ट्रेंड तिने बॉलीवूडमध्ये आणले. करीनाला यावर्षी बॉलीवूडमध्ये २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. याच पार्श्वभूमीवर तिच्या विविधांगी भूमिका असलेले चित्रपट सिनेमागृहात दाखवले जाणार असून, तिच्याच नावाने चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.नुकतेच करीनाला तिच्याच सिनेमांच्या चित्रपट महोत्सवाच्या एका कार्यक्रमात "तुमच्या नावाने सिनेमहोत्सव सुरू होणार आहे, याची तैमूरला कल्पना आहे का?" हा प्रश्न विचारण्यात आला. यावर उत्तर देताना करीना म्हणाली की, तो अजून खूप लहान आहे, त्यामुळे त्याला याबाबत तशी कमी माहिती आणि समज आहे. जेव्हा पापाराझी आमच्या मागे येतात, त्यावरून त्याला थोडी कल्पना असेल.करीनाच्या नावाने सिनेमहोत्सव २० सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. या महोत्सवाच्या एका कार्यक्रमात करीना म्हणाली की, "तैमूर आणि मी जेव्हा एकत्र असतो, तेव्हा पापाराझी आमचा पाठलाग करतात. तेव्हा तैमूर म्हणतो, 'सर्व लोक आपला पाठलाग का करत आहेत? मी लोकप्रिय आहे का?' त्यावर करीना तैमूरला म्हणाली की, 'तू नाही, मी लोकप्रिय आहे.

## श्रेयस अय्यरची लॉटरी संघात स्थानासह कर्णधारपदाची जबाबदारीही मिळणार

# श्रेयस अय्यरची लॉटरी लागणार?

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ स्पर्धेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघात श्रेयस अय्यरला स्थान देण्यात आलेलं नाही. श्रेयस अय्यरने आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली, असं असतानाही त्याला संघात स्थान न दिल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली होती. आयपीएलमध्ये ६०० धावांचा पल्ला गाठणाऱ्या श्रेयस अय्यरला लवकरच पुनरागमनाची संधी मिळू शकते यासह मोठी जबाबदारी देखील मिळू शकते.**

## श्रेयस अय्यर बनला कर्णधार!



आशिया चषकासाठी श्रेयस अय्यरची निवड करण्यात आलेली नाही, पण लवकरच त्याला मोठी लॉटरी लागू शकते. येत्या काही दिवसात ऑस्ट्रेलिया अ संघ भारत दौऱ्यावर येणार आहे. या दौऱ्यावर कसोटी आणि मर्यादीत षटकांच्या मालिका देखील होणार आहे. माध्यमातील वृत्तानुसार, या मालिकेसाठी श्रेयस अय्यरची भारतीय अ संघात संधी मिळू शकते. यासह कर्णधारपदाची जबाबदारी देखील मिळू शकते. क्रिकबझने दिलेल्या वृत्तानुसार, श्रेयस अय्यरकडे भारतीय अ संघाची जबाबदारी सोपवली जाऊ शकते. ऑस्ट्रेलिया अ संघाविरूद्ध होणाऱ्या मालिकेसाठी बीसीसीआयकडून भारतीय अ संघाची घोषणा करण्यात आलेली नाही. श्रेयस अय्यरला या संघात स्थान मिळणार, हे जवळजवळ निश्चित आहे, पण बीसीसीआय त्याच्याकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवणार का? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.बीसीसीआयच्या सुत्राने क्रिकबझला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की,“भारतीय अ संघात श्रेयस अय्यरला स्थान दिले जाऊ शकते. सध्या तो दुलीप ट्रॉफी स्पर्धा खेळत आहे. रेड बॉल क्रिकेटसाठी त्याच्याकडे भारतीय अ संघाची जबाबदारी सोपवली जाऊ शकते.”श्रेयस अय्यरने गेल्या काही महिन्यांपासून दमदार फलंदाजी केली आहे. देशांतर्गत क्रिकेट आणि आयपीएल स्पर्धेतही त्याच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. आयपीएल २०२५ मध्ये फलंदाजी करताना त्याने ६०० हून अधिक धावा कुटल्या. सध्या तो बंगळुरूत सुरू असलेल्या दुलीप ट्रॉफी स्पर्धेत वेस्ट झोन संघाचं प्रतिनिधित्व करत आहे.

या स्पर्धेतील दुसऱ्या सेमीफायनलमध्ये फलंदाजी करताना त्याला आपली छाप सोडता आलेली नाही. पहिल्या डावात तो २५ धावा करत माघारी परतला. पण एका डावामुळे त्याच्या कामगिरीवर प्रश्न उपस्थित करता येणार नाही. कारण त्याने सातत्याने स्वत:ला सिद्ध केलं आहे.येत्या ९ सप्टेंबरपासून आशिया चषक २०२५ स्पर्धेची सुरुवात होणार आहे. या स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या भारतीय संघात श्रेयस अय्यरची निवड केली गेली नव्हती. आयपीएल गाजवली, देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली तरीसुद्धा त्याला आधी इंग्लंड दौऱ्यासाठी स्थान दिलं गेलं नव्हतं. आता आशिया चषक स्पर्धेसाठीही त्याची निवड केली गेली नव्हती. या निर्णयामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. पण आता त्याला थेट संघाचा कर्णधार बनवण्यात आलं आहे. येत्या काही दिवसात ऑस्ट्रेलिया अ संघ मल्टी डे सामन्याच्या मालिकेसाठी भारत दौऱ्यावर येणार आहे. या मालिकेसाठी बीसीसीआयकडून भारतीय अ संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी श्रेयस अय्यरकडे सोपवण्यात आली आहे. तर उपकर्णधारपदाची जबाबदारी ध्रुव जुरेलकडे सोपवली गेली आहे. याआधी श्रेयस अय्यरने कोलकाता नाईट रायडर्स संघाला जेतेपद मिळवून दिलं होतं. २०२५ मध्ये झालेल्या हंगामात त्याने पंजाब किंग्ज संघाला अंतिम फेरीत पोहोचवलं होतं. त्याने नेतृत्वात आणि फलंदाजीतही दमदार कामगिरी केली, या कामगिरीचं फळ त्याला मिळालं आहे.तर मालिकेतील दुसरा सामना २३ सप्टेंबरपासून सुरू होईल. भारतीय अ संघात साई सुदर्शन, प्रसिध कृष्णा आणि देवदत्त पडिक्कल यांना देखील स्थान देण्यात आलं आहे.

### दोन्ही सामने लखनऊच्या मैदानावर

मालिकेतील दुसऱ्या सामन्यासाठी भारतीय संघात मोठा बदल केला जाणार आहे. या सामन्यात भारतीय संघातील अनुभवी खेळाडू केएल राहुल आणि मोहम्मद सिराज यांचा देखील समावेश करण्यात येणार आहे. हे दोन्ही खेळाडू आल्यानंतर पहिल्या सामन्यासाठी निवडण्यात आलेल्या दोन खेळाडूंना बाहेर केलं जाईल. हे दोन्ही सामने लखनऊच्या मैदानावर खेळवले जाणार आहेत.

# चाहत्यांचा रोहितच्या कारला घेराव

## ‘मुंबईचा राजा’ घोषणानंतर हिटमॅनची कृती एकदा पाहाच

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रोहित शर्मा हा भारतातील सर्वात लोकप्रिय क्रिकेटपटूंपैकी एक आहे. रोहितचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे, ज्यात तो बाप्पाचं दर्शन घेताना दिसून येत आहे. रोहितने वरळीतील मुंबई पोलिसांचा राजा या गणपती मंडळाला भेट देऊन बाप्पाचं दर्शन घेतलं. त्याला पाहण्यासाठी चाहत्यांनी तुफान गर्दी केली होती. त्याची कार जायला देखील जागा नव्हती.**



मुंबईकर रोहित शर्मा जेव्हा मैदानावर उतरतो. तेव्हा मैदानात उपस्थित असलेले हजारो क्रिकेट चाहते ‘मुंबईचा राजा रोहित शर्मा’अशी घोषणा करतात. यावेळी तो स्वत: मुंबई पोलिसांच्या राज्याचं दर्शन घेण्यासाठी आला. त्याची एक झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी तुफान गर्दी केली आणि ‘मुंबईचा राजा रोहित शर्मा’अशा घोषणा दिल्या.रोहितला पाहण्यासाठी हजारो चाहते तिथे उपस्थित होते. त्यामुळे त्याची कार जायला देखील जागा नव्हती. त्यामुळे रोहितने स्वत: कारचं सनरूफ उघडलं आणि चाहत्यांना बाजूला करताना दिसून आला. रोहितचा हा अंदाज चाहत्यांना चांगलाच भावला. कारण साधारणपणे कुठलाही क्रिकेटपटू किंवा सेलिब्रिटी गर्दीत कारमधून बाहेर येणं टाळतो. मात्र, रोहित आपल्या चाहत्यांना कधीच नाराज करत नाही. रोहितनंतर ही जबाबदारी हार्दिक पांड्याकडे सोपवण्यात आली आहे.रोहितने कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. तो केवळ वनडे क्रिकेट खेळताना दिसून येणार आहे. येत्या ऑक्टोबर महिन्यात भारताचा संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यावर रोहित शर्मा पुनरागमन करताना दिसून येऊ शकतो.

### संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार

दरम्यान रोहित आयसीसी वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धा खेळून निवृत्ती जाहीर करणार असल्याचं म्हटलं जात आहे. तर काही वृत्तात असं म्हटलं गेलं आहे की, तो ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर वनडे क्रिकेटला रामराम करू शकतो. पण रोहितने फिटनेस टेस्ट यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. यावरून असा अंदाज व्यक्त केला जात आहे की, त्याने २०२७ वर्ल्डकपसाठी तयारी सुरू केली आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

।सोमवार।
।दि. 8 सप्टेंबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ज्ञानाच्या प्रकाशामुळेच एक पिढी उजळते

# शिक्षक हे समाजातील खरे दीपस्तंभ - विनायक भोंगाळे

### शिक्षण विश्व : गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये शिक्षक दिन साजरा




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिक्षक हे समाजातील खरे दीपस्तंभ आहेत. त्यांच्या ज्ञानाच्या प्रकाशामुळेच एक पिढी उजळते," असे गौरवोद्गार गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलचे संस्थापक अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.**

मोशी येथील गायत्री इंग्लिश मीडियम शाळेत ५ सप्टेंबर रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन अत्यंत उत्साही आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमापूजनाने झाली. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत खास भाषणे, गीत, नृत्य, नाटिका आणि विनोदी सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी शिक्षक, मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापकाच्या भूमिका पार पाडत 'रोल रिव्हर्सल' उपक्रमाच्या माध्यमातून शाळा चालवण्याचा अनुभव घेतला. हा उपक्रम विशेष आकर्षण ठरला.

या दिवशी सर्व शिक्षकांचा शाळेत औपचारिक सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांना शुभेच्छापत्रे, भेटवस्तू व फुलांचे बुके देऊन आपले प्रेम व्यक्त केले. शिक्षकांसाठी खास खेळ, मनोरंजनात्मक कार्यक्रम आणि कविता सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले. काही शिक्षकांनी आपल्या भावना मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषांमध्ये व्यक्त करत विद्यार्थी जीवनातील आठवणीही शेअर केल्या.

संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालिका कविता कडू पाटील यांनी आपल्या मनोगतातून सांगितले, "शिक्षक हे केवळ ज्ञान देणारे नसून विद्यार्थ्यांचे जीवन घडविणारे मार्गदर्शक असतात. त्यांच्या मोलाच्या योगदानामुळे समाज पुढे जातो."

कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती अंजली भागवत व विपणन अधिकारी शैलेंद्र सिंग यांनीही उपस्थित राहून शिक्षकांना शुभेच्छा दिल्या व त्यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे नमूद केले. या प्रसंगी मुख्याध्यापक ज्योतिबा सुरवसे, उपमुख्याध्यापक, शिक्षकवृंद व संपूर्ण विद्यार्थीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. सर्व कार्यक्रम संयोजन विद्यार्थ्यांच्या मदतीने करण्यात आले होते. शाळेचा सभागृह उत्साह, आनंद व प्रेरणादायी वातावरणाने भरून गेले होते.

## गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलच्या खेळाडूंचे नेत्र दीपक यश

### शिक्षण विश्व: खेळाडू जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत यशस्वी




। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा क्रीडा परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तर तायक्वांडो आणि कॅरम स्पर्धांमध्ये मोशी येथील गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत अनेक पदकांची कमाई केली. या स्पर्धांमध्ये परिसरातील विविध शाळांमधून स्पर्धक सहभागी झाले होते.**

या स्पर्धांमध्ये गायत्री स्कूलच्या भावेश सावरे याने वयोगट १७ मध्ये आणि संकेत कारके याने वयोगट १९ मध्ये सुवर्णपदक पटकावले. दोघांनीही आपला आक्रमक पवित्रा, अचूक हालचाली आणि तांत्रिक कौशल्याच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवला. याशिवाय श्लोक गाडेकर याने वयोगट १९ मध्ये रौप्यपदक पटकावले तर आर्या फडाले हिने देखील उत्तम खेळाचे प्रदर्शन करत रौप्यपदकावर आपले नाव कोरले.

तायक्वांडोप्रमाणेच कॅरम या बुद्धिमत्तेच्या आणि अचूकतेच्या खेळातही शाळेच्या विद्यार्थिनींनी सरस कामगिरी करत आपली छाप सोडली. तनाया पाटील हिने उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला, तर श्रद्धा रेड्डी हिने कांस्यपदक मिळवले. विशेष म्हणजे या दोन्ही खेळाडूंनी त्यांच्या वयोगटात लक्षणीय वर्चस्व गाजवत क्षेत्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी आपली निवड पक्की केली आहे. या यशस्वी कामगिरीनंतर शाळेचे संस्थाध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांनी खेळाच्या माध्यमातून शिस्त, चिकाटी आणि मेहनतीचा उत्तम आदर्श घालून दिला आहे. हेच खेळाडू भविष्यात शाळेच्या आणि देशाच्या क्रीडा क्षेत्रात नावलौकिक मिळवतील."

त्याचप्रमाणे शाळेच्या व्यवस्थापकीय संचालिका कविताताई कडू पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली भागवत, विपणन अधिकारी शैलेंद्र सिंग, मुख्याध्यापक, सर्व उपमुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि पालकांनी विजयी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला.


Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm Your Application Now!
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046